**निशाणी क्र. ५९ वरील आदेश**

प्रतिवादी क्र. ३० याने प्रस्तुतचा अर्ज निशाण क्र. ५२ च्या अर्जास म्हणणे दाखल करणेची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. त्याच्या म्हणण्यानुसार त्याच्या अशिक्षितपणामुळे सदर अर्जाची माहिती त्याला समजू शकली नाही. त्यामुळे न्यायालयाने दिनांक ६/८/२०१६ इ. रोजी सदर अर्जावर प्रस्तुत प्रतिवादीचे म्हणणे नाही असा आदेश पारीत केला आहे. सदर अर्जास प्रस्तुत प्रतिवादीने म्हणणे देणे अत्यावश्यक आहे. सबब, या कारणास्तव त्याने निशाण क्र. ५२ च्या अर्जास म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार सदर अर्जातील कारण संयुक्तीक नाही. विना म्हणणेचा आदेश रद्दबातल करण्याची मागणी प्रस्तुत प्रतिवादीने केली नाही. अर्जातील नमूद कारण खोटे व खोडसाळ आहे. सबब, या कारणास्तव त्याने प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

**३.** प्रतिवादी क्र. ३० व वादी तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**४.** प्रतिवादी क्र. ३० याने अर्जाचे पुष्ठयर्थ शपथपत्र सादर केले आहे. यावरुन प्रस्तुत प्रतिवादीच्या अर्जातील नमूद कारण योग्य आहे असे मानता येईल. वादीने दाखल केलेल्या निशाण क्र. ५२ च्या अर्जाचा निकाल गुणावगुणावर होणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातून अर्जाचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. ३० यास सदर अर्जास म्हणणे सादर करण्याची संधी देणे न्यायोचित वाटते. मात्र झालेल्या विलंबाबाबत सदर प्रतिवादी क्र. ३० याने वादीस खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे :

## – **आदेश** –

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ३० यास निशाण क्र. ५२ च्या अर्जास म्हणणे दाखल करण्यास खालील अटीवर परवानगी देण्यात येते.

३. प्रतिवादी क्र. ३० याने पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम म्हणून रुपये ४००/– दयावी. त्याने त्यापैकी रक्कम रुपये २००/– वादीस दयावी व उर्वरित रक्कम रुपये २००/– सरकार जमा करावी.

स्थळ : देवगड ( गि. सु. माने )
दिनांक : ०२/०१/२०१७ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.